REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १ नोव्हेंबर, १९४४ अंक ४३

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

स्थापना : १९३५
हेड ऑफिस : पुणें शहर

### विक्रीस काढलेलें नवीन भांडवल
### रु. १०,००,०००

**( प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें )**

वरील शेअर्स ता. ४-१०-४४ रोजीं बँकेच्या रजिस्टरवर असलेल्या शेअर होल्डरांना त्यांच्या प्रत्येक जुन्या १ शेअरला १ नवीन शेअर असे रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. पहिल्या शेअर-होल्डरांनीं घेऊन उरलेले शेअर्स इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५-१२-४४ ही आहे.

—डायरेक्टर बोर्ड—

**श्री. धों. कृ. साठे, चेअरमन**

श्री. व्ही. पी. वर्दे, प्रो. व्ही. जी. काळे, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एस. जी. मराठे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एफ. डी. पदमजी, श्री. एम. व्ही. गोखले, श्री. व्ही. एच. देशमुख.

विशेष माहितीसाठीं लिहा.

सी. व्ही. जोग, मॅनेजर

## देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

देना बँकेच्या ठेवीदारांच्या फायद्यासाठी

### सेव्हिंग्ज इन्शुअरन्स योजना

तपशीलाकरितां भेटा अगर लिहा :

हेड ऑफिस : मुंबई आणि स्थानिक शाखा

देना बँकेच्या सर्व कचेऱ्यांत, हिंदुस्थान सरकारचे १० रुपये व १०० रुपये किंमतीचे प्राइस बाँड्सहि विकत मिळतात.




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी

पुणें एजंटः—
द. ना. हेजीब

## —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

## —गोल्डन कोको—

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानं पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

### साठे बंधू, "गोल्डन कोको"

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

# विविध माहिती

### गव्हाच्या रोटीचें रेशनिंग नाहीं.

ग्रेट ब्रिटनमध्यें चालू युद्धांत रोटीचें रेशनिंग कधींच करण्यांत आलेलें नाहीं. ४ पौंड वजनाच्या रोटीची किंमत ९ पेन्सच्या वर गेलेली नाहीं. ओट, राय, बार्ली, इत्यादि गव्हांत मिसळून रोटी बनविण्याची पाळी मागें आली होती, परंतु आतां ब्रिटिश लोकांना शुद्ध गव्हाची बाटेल तेवढी रोटी स्वस्त दरानें मिळूं शकते.

### इंग्लंडमधील काळाबाजार

बेकायदा व्यवहार करण्याबद्दल ज्या आठवड्यांत कोणाचाहि लायसेन्स रद्द झाला नाहीं, असा इंग्लंडमध्यें एकहि आठवडा जात नाहीं. प्रत्येक प्रकरणाची कसोशीनें चौकशी केली जाते व शिक्षा झालेले लोक फारशी तक्रार करीत नाहींत. कोणत्या तरी प्रकारच्या काळ्या बाजारांत त्यांचा व्यवहार चालू असला पाहिजे, हें त्यावरून स्पष्ट दिसतें.

### स्वीडनमधील सहकारी चळवळ

युद्धजन्य परिस्थितींतहि स्वीडनमध्यें सहकारी चळवळीची उत्कृष्ट प्रगति होत आहे. तेथील एकूण ६४ लक्ष वस्तीपैकीं किमान २४ लक्ष लोकांचीं ८ लाख कुटुंबें सहकारी संघटनेचीं सभासद आहेत.

### म्युनिसिपॅलिटीकडील बिलांचे पैसे घरपोंच मिळणार

मुंबई शहर म्युनिसिपॅलिटीच्या केलेल्या कामाबद्दल तिनें बिलांची अदा करावयाची रकम चेकनें करण्याबाबत म्युनिसिपल कमिशनर व इंडियन मर्चंटस चेंबर ह्यांत पत्रव्यवहार होऊन, चेंबरच्या सभासदांना खालील अटींवर सवलती मिळाव्यात असें ठरलें:—

(१) बिलांवर "पोस्टानें क्रॉस्ड-ऑर्डर चेक पाठवावा" असें प्रामुख्यानें लिहिण्यांत यावें.

(२) १०० रुपयांवरील रकमा म्युनिसिपॅलिटीनें क्रॉस्ड-ऑर्डर चेकनें साध्या टपालानें पाठवाव्या व त्याचा तपशील देणारें एक कार्डहि त्याबरोबर स्वतंत्र टाकावें.

(३) चेंबरच्या सभासदांनीं चेकची पोच उलट टपालीं द्यावी. तशी ती न दिल्यास वरील सवलत रद्द होईल.

(४) १०० रुपयांपर्यंतच्या रकमा रोखीनें चीफ अकौंटंटच्या कचेरीतच पूर्वीप्रमाणें मिळतील.

### उत्तर आफ्रिकेंतील युद्ध स्मारक

आल-आलमेन येथें एक बाग तयार करून त्यांत उत्तर आफ्रिकेंतील वाळवंटी युद्धांत मरण पावलेल्या ८,००० ब्रिटिश व ब्रिटिश साम्राज्यांतील सैनिकांस पुरण्यांत येईल. बाग तयार करण्यासाठी व नांवाचे दगड रोवण्यासाठी एक लक्ष रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. युद्धसमाप्तीनंतर, ह्या युद्धक्षेत्रास भेट देणाऱ्या मृत सैनिकांच्या नातेवाइकांसाठी उतरण्याची सोयहि करण्यांत यावयाची आहे.

### सहकारी सोसायट्या व त्यांचे सभासद

सबंद जगांत एकूण ८,१०,००० सोसायट्या असून त्यांच्या सभासदांची संख्या १४ कोटि, ३० लक्ष आहे, अशी माहिती इंटरनॅशनल लेबर आफिसनें प्रसिद्ध केली आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें उपभोक्त्यांच्या सोसायट्यांची प्रगति चांगली झाली आहे. तेथील टोअर्सचे पटावर ९० लक्ष सभासद आहेत.

### ॲक्चुअरीच्या परीक्षा

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुअरीजच्या परीक्षा युद्धपरिस्थितीमुळें गेलीं कांहीं वर्षें बंद ठेवण्यांत आल्या होत्या, त्या पुनः येत्या वर्षी सुरू होणार आहेत. हिंदुस्थानांतील विमा कंपन्यांचीं ॲक्चुअरीचीं कामें शक्यतोंवर फेलोजकडूनच करविलीं जावीं, अशी दुरुस्ती विमा कायद्यांत करण्यांत आली आहे, परंतु ॲक्चुअरीच्या परीक्षा मात्र बंद आहेत. त्या लवकर सुरू झाल्यामुळें, हिंदी विद्यार्थ्यांची सोय होणार आहे.

### "देना बँके"च्या बऱ्हाणपूर येथें दोन शाखा

देवकरण नानजी बँकिंग कंपनी लि. च्या बऱ्हाणपूर (मध्यप्रांत) येथील दोन शाखांचा उद्घाटन समारंभ मंगळवार ता. ३१ रोजीं निमार जिल्ह्याचे डे. कमिशनर खान बहादूर एफ. के. खान ह्यांचे हस्तें झाला. "देना बँके"च्या शाखांची संख्या आतां ३० झाली आहे.

### श्री. कागल ह्यांचा दौरा

श्री. बी. आर. कागल (अॅड. ऑफिसर, जमशेदपूर) ह्यांची हेल्थ सर्व्हे अँड डेव्हलपमेंट कमिटीनें हिंदुस्थानांतील प्रमुख शहरांच्या शहरविस्तारयोजनांची पहाणी करण्याकरितां नेमणूक केली आहे. श्री. कागल त्यासाठी हिंदुस्थानभर दौरा काढणार आहेत. पुणें व खडकी येथें त्यांचा १ ते २ व ३ ते ५ नोव्हेंबर असा मुक्काम होणार आहे. त्यांच्या पहाणीचे आधारावर कमिटी आपल्या शिफारसी करील.

### जनावरांचीं प्रदर्शनें

ऑल इंडिया कॅटल शो कमिटीनें १९४३-४४ मध्यें जनावरांचीं एकूण ४० प्रदर्शनें भरविलीं, त्यांत ५५ जातींच्या ९,००० जनावरांनीं भाग घेतला. एकूण १८,००० रुपयांचीं बक्षिसें वांटण्यांत आलीं. १९४४-४५ मध्यें ५० प्रदर्शनें भरवून २७,००० रुपयांचीं बक्षिसें देण्यांत येतील.

### विवाह केल्यामुळें जागेचा राजिनामा देणार

इजिप्त सरकारचे ग्रेट ब्रिटनमधील वकील, डॉ. हसन पाशा (वय ५५ वर्षें) ह्यांनीं मिस मेरी प्रीस्ट (वय २३ वर्षें) हिच्याशीं ता. २४ ऑक्टोबर रोजीं विवाह केला. इजिप्शन कायद्याप्रमाणें, जबाबदारीचीं कामें करणाऱ्या अधिकाऱ्यांस परदेशी स्त्रीशीं विवाह करण्याची मनाई असल्याकारणानें, डॉ. हसन पाशा ह्यांना आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागेल. मिस प्रीस्टनें मुसलमानी धर्म स्वीकारला आहे.

### ब्रिटिश निर्गतींत घट

१९३८ चे मानानें आतां ब्रिटिश निर्गत व्यापार निम्म्यावर आला आहे. १९३८ सालीं निर्गतीची किंमत राष्ट्रीय मिळकतीच्या १०.२% होती; आतां तत्सम प्रमाण २.८% वर आलें आहे.

### युद्ध संपेपर्यंत थांबा

इराणमधील तेलाच्या खाणींचे बाबत करार करण्यासाठी रशिया, इंग्लंड व अमेरिका ह्यांची चढाओढ लागली आहे, परंतु युद्धसमाप्तीनंतरच ह्यासंबंधांत बोलणीं करण्याचें इराणच्या सरकारनें ठरविलें आहे.

### नुकसानभरपाई मागण्याची मुदत वाढविली.

मुंबईमध्यें गेल्या एप्रिलमध्यें झालेल्या स्फोटामुळें नुकसान पावलेल्यांनीं नुकसानभरपाईची मागणी करण्याची मुदत ३१ ऑक्टोबरअखेर होती, ती आतां ३० नोव्हेंबरअखेर वाढविण्यांत आली आहे.

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३५४ |
| २ हिंदी बँकांची प्रगति | ३५५ |
| ३ नगर-सुधारणा ... | ३५६ |
| ४ फिलिपाइन्सवर अमेरिकेची चढाई ... | ३५६ |
| ५ स्फुट विचार ... ... हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण—आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधी–हिंदी विमा कायद्यांत सुधारणा—कै. गुरुनाथराव ओगले—शोकप्रदर्शन व स्मारक—पुणें सहकारी सप्ताह | ३५७ |
| ६ बँक ऑफ महाराष्ट्र लि. | ३५८ |
| ७ पत्नीच्या नांवाचें उत्पन्न | ३५९ |
| ८ सहकारी बँकांचे अहवाल | ३५९ |
| ९ औद्योगिक शेअर्सच्या किंमतींत वाढ ... ... | ३६० |
| १० संगमनेर व्यापारी असोसिएशन ... ... | ३६० |


# अर्थ

बुधवार, ता. १ नोव्हेंबर, १९४४

## हिंदी बँकांची प्रगति

### लहान हिंदी बँकांस वाव पाहिजे

दक्षिण हिंदुस्थानांतील जॉइंट स्टॉक बँकांच्या असोसिएशनतर्फे बँकांची एक परिषद् मद्रास येथें नुकतीच भरविण्यांत आली होती. रिझर्व्ह बँकेचे एक डेप्युटि गव्हर्नर, मि. वजाहत हुसेन, हे परिषदेंत उपस्थित होते. मि. टी. टी. कृष्णमाचारी ह्यांनीं आपल्या भाषणांत गेल्या तीन-चार वर्षांतील बँकिंगच्या प्रगतीचा आढावा घेतला. बँकांच्या ठेवींत वाढ झाली त्या प्रमाणांत त्यांचा व्यवहार वाढलेला नाहीं, ह्यावरून देशांतील आर्थिक परिस्थिति सुधारल्याचें दिसत नाहीं असें अनुमान त्यांनीं काढलें. लहान बँकांनीं देशाच्या अंतर्गत भागांत चालविलेलें काम मोठ्या, खर्चिक बँकांच्या शाखांना नीट करतां येणार नाहीं व लहान बँकांची जागा त्या घेऊं शकणार नाहींत, असें त्यांनीं सांगितलें. लहान बँकांचा व्यवस्थेचा खर्च बेताचा असतो, स्थानिक लोकांशीं बँकरचा प्रत्यक्ष परिचय असतो व त्यामुळें बेताच्या व्याजानें त्या कर्जे देऊं शकतात. ह्या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, लहान बँकांना केवळ त्यांचा आकार लहान म्हणून, मोठ्या बँकांशीं प्रतिकूल स्पर्धेत कायद्यानें टाकणें योग्य होणार नाहीं. बँकेचें किमान शेअर भांडवल ५०,००० रु. असलें पाहिजे, असें कंपनी कायद्यांतील १९३६ च्या दुरुस्तीनें ठरविलें आणि आतां ही मर्यादा १,००,००० रुपयांपर्यंत नेण्याचा हिंदुस्थान सरकारचा बेत आहे. ही गोष्ट लहान बँकांस अत्यंत जाचक होणार आहे. बँकांचें भाग भांडवल स्थानिक लोकसंख्येच्या प्रमाणांत व शाखांच्या संख्येवर अवलंबून असावें, अशीहि दुरुस्ती कायद्यांत सुचविण्यांत येणार आहे.

बँकेचा विस्तार तिच्या भाग भांडवलाच्या प्रमाणाबाहेर असूं नये, हें तत्त्व ठीक आहे, परंतु त्यासंबंधांत नियम घालणें अवघड आहे. बँकांच्या एकूण जिंदगीपैकीं किमान ३०% रकम तरती पाहिजे, अशीहि एक सुधारणा सुचविली जाईल असें कळतें. ही अट विशेषतः लहान बँकांना जाचक होईल, हें उघड आहे. रिझर्व्ह बँक आपल्या सभासद बँकांस कांहीं विशिष्ट परिस्थितींत विशिष्ट अटींवर अडचणीचे प्रसंगीं आपल्या नियमानुसार मदत करूं शकते, परंतु ह्यासंबंधांतील कायदा आज फारसा सहायकारक नाहीं. त्यांत सुधारणा करावी, अशी श्री. कृष्णमाचारी ह्यांची सूचना आहे. इंपीरिअल बँकेकडे रिझर्व्ह बँकेच्या कामाची एजन्सी आहे, परंतु इंपीरिअल बँकेच्या भागीदारांत विदेशीयांचें प्राबल्य आहे आणि तिची व्यवस्था बहुंशीं विदेशीयांकडेच आहे. त्याकारणानें, सरोसरीच्या हिंदी बँकांचा ह्या व्यवहाराशीं संबंध येत नाहीं व रिझर्व्ह बँक आणि इतर हिंदी बँका ह्यांच्या व्यवहारांची एकतानता होत नाहीं. हिंदुस्थानाच्या राजकीय दर्जाचा हा परिणाम आहे, अशी ह्या परिस्थितीवर श्री. कृष्णमाचारी ह्यांनीं टीका केली. इंपीरिअल बँकेस हिंदी बँकिंगच्या आकांक्षांबद्दल ओलावा वाटत नाहीं, परंतु एजन्सीच्या व्यवहाराचें मोठें थोरलें कमिशन मात्र तिला मिळतें, तेव्हां त्या कमिशनमध्यें इतर बँकांस वाटा मिळावा, असें त्यांनीं सुचविलें.

मि. कृष्णमाचारी ह्यांनीं दिग्दर्शित केलेल्या मुद्यांचा समावेश, असोसिएशननें मि. वजाहत हुसेन ह्यांस सादर केलेल्या पत्रकांत करण्यांत आला होताच, परंतु कित्येक बँकांनीं रिझर्व्ह बँकेच्या शेड्यूलमध्यें जागा मिळविण्यासाठीं शेअर भांडवल वाढविण्याची परवानगी मागितली असतांना ती मिळाली नाहीं, ही गोष्ट त्यांचे प्रामुख्यानें नजरेस आणण्यांत आली. सध्याची वेळ भांडवलवाढीस सोयीची असल्यानें, सरकारनें बँकांना भांडवल वाढविण्यास मुक्त हस्तें परवानगी द्यावी, अशी रिझर्व्ह बँकेनें सरकारास सूचना करण्याबद्दल पत्रकांत आग्रह धरण्यांत आला होता. मि. हुसेन ह्यांनीं बँकांच्या असोसिएशनचें लहान बँकांच्या व्यवहारवाढीबद्दल जें म्हणणें होतें, त्यास सर्वसाधारणपणें पुष्टी दिली. भांडवलवाढीच्या अर्जासंबंधीं त्यांनीं खुलासा करतांना, योग्य कारणांखेरीज कोठल्याहि बँकेचा अर्ज नामंजूर करण्यांत आलेला नाहीं असें सांगितलें. मद्रास प्रांतांतील ६० बँकांनीं भांडवल वाढविण्याची परवानगी मागितली, त्यांपैकीं ३६ बँकांना ती मिळाली. बँकेवरील जनतेचा विश्वास ठेवींच्या वाढीचे रूपानें वाढत आहे किंवा नाहीं, हें पाहूनच भांडवल वाढविण्याची परवानगी दिली जाते. ज्यांचे अर्ज नामंजूर केले, अशा पांच बँकांचीं त्यांनीं उदाहरणें घेऊन, रिझर्व्ह बँकेच्या धोरणांत तक्रारीस कशी जागा नाहीं, हें पटवून दिलें. अर्ज आला कीं तो मंजूर करणें हिंदी बँकिंगच्या हितकारक वाढीस पोषक होणार नाहीं, हा त्यांचा मुद्दा होता. बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कांहीं अडचणींचा उल्लेख असोसिएशननें आपल्या पत्रकांत केला होता, त्याबाबत मि. हुसेन ह्यांनीं खुलासा केला व कांहीं अडचणी दूर होणें अगदी शक्य आहे असें सांगितलें.

### उडत्या बॉंबमुळें लंडनमधील घरांचें नुकसान

जर्मन उडत्या बॉंबच्या प्रखर हल्ल्यांचे काळांत लंडनमधील २३,००० घरांचा नाश झाला व ११,०४,००० घरांची कमी-अधिक प्रमाणांत नादुरुस्ती झाली. ह्या ११,०४,००० घरांपैकीं विशेष नुकसान पावलेल्या घरांची संख्या सुमारें ३,००,००० इतकी भरेल. दुरुस्तीचें काम चालू आहे. १०,००० झोपड्या तातडीनें बांधण्यांत येत आहेत. थंडीमध्यें लंडन शहरवासीयांच्या हालांत कोळशाच्या तुटवड्याची आणखी भर पडणार आहे.

## नगर–सुधारणा

### तत्त्व आणि महत्त्व

[ प्रो. काळे ह्यांनीं कोल्हापूरच्या नगरपालिकेस नव्वद वर्षे पुरीं होऊन तिला नवीन व उच्च दर्जा प्राप्त झाला आणि तिनें नगर सुधारणेचें कार्य योजनात्मक पद्धतीनें उत्साहपूर्वक रीतीनें चालू केलें, ह्यासंबंधांतील उत्सवांत केलेल्या भाषणांतील कांहीं उतारे. ]

नागरिकांचें जीवन सुखकारक करण्याचे प्रयत्न होण्यास आणि त्यांस यश येण्यास प्रथम त्यांच्यापैकी सुज्ञ लोकांस असल्या सुधारणांचें महत्त्व पटलें पाहिजे आणि त्यांनीं आपल्या बांधवांस अनुकूल करून घेतलें पाहिजे. चांगले व रुंद रस्ते, सार्वजनिक स्वच्छता, शिक्षणाच्या उत्तम सोयी, उद्यानें, क्रीडांगणें, हवा व उजेड ह्यांचा भरपूर पुरवठा असलेलीं घरें, शुद्ध पाण्याची व दिव्यांची सोय, इत्यादि गोष्टी व्यक्ती, कुटुंबें, समाज व राष्ट्र ह्यांच्या जीवितास आवश्यक आहेत. ह्याविषयींची आस्था अनेकांस वाटत नाहीं. आधुनिक शास्त्रीय शोध व पद्धति ह्यांचे योगानें मानवी सुखसोयींत भर घालण्याचीं साधनें उपलब्ध झालीं आहेत व त्यांचा विनियोग करण्याची इच्छा सामान्य नागरिकांत दृढमूल होणें आवश्यक आहे. पुढारलेल्या देशांत आणि ह्या देशांतील प्रगमनशील शहरांत नवीन उपाय व योजना ह्यांच्या सहाय्यानें रोगराई, साथी इत्यादि आपत्तींस आळा घालण्यांत आला आहे. ह्या अनुभवापासून बोध घेण्याची जनतेच्या मनाची तयारी केली जाणें अगत्याचें आहे. आपण ज्या गावांत रहातों आणि जेथें आपलीं मुलेंबाळें लहानाचीं मोठीं होऊन नांदणार त्या ठिकाणाविषयीं प्रत्येकास प्रेम आणि आस्था वाटली पाहिजे. आपला देश सर्व दृष्टींनीं सुंदर व आदरणीय करण्याच्या प्रयत्नास हातभार लावणें हें आपलें कर्तव्य आहे. नागरिकत्वाचीं कर्तव्यें आणि जबाबदाऱ्या ह्याविषयींची जाणीव जनतेमध्यें जागृत रहाणें आवश्यक आहे.

अज्ञान आणि व्यक्तिस्वार्थ ह्यांच्यामुळें अशा पुनर्रचनेस विरोध होत असतो. मुंबई, पुणें ह्यांसारख्या शहरांतहि अशा विरोधाची भूमिका समजुतदार समजल्या जाणाऱ्या लोकांनीं घेतलेली प्रसिद्ध आहे. पुण्यांत फुले मार्केट हें एक नगराचें भूषण मानलें जातें. परंतु शनवारांतील जुनी, गैरसोयीची मंडई सोडून तेथें व्यवहार करण्यास तीव्र विरोध झाला होता आणि मार्केटाचें भव्य शिखर उभारण्याच्या योजनेच्या निषेधार्थ सभा भरलेल्या मीं पाहिल्या आहेत. देवालयें जशीं मानवी पारमार्थिक संस्कृतीचीं प्रतीकें आहेत, तशींच सार्वजनिक ऐहिक स्वास्थ्यासाठी उभारलेलीं भुवनेंहि मानवतेचीं प्रकट रूपें आहेत, अशी भावना निर्माण होणें इष्ट आहे. कोल्हापूर नगरपालिकेच्या सुधारणांच्या योजनांचें सामान्यतः स्वागत केलें जाऊन त्यांस लोकांचा पाठिंबा मिळत आहे हें उत्तेजनात्मक आहे आणि आपल्या जुन्या जमान्यांतून नवीन युगांत संक्रमण होत असल्याचें स्पष्ट दिसत आहे.

नगरें आणि खेडीं ह्यांमध्यें आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, स्वच्छता इत्यादि बाबींची व्हावयाची व्यवस्था स्थानिक स्वराज्याच्या कक्षेंत येते. मुख्य राज्यकर्त्या संस्थेचीं जीं अनेक कर्तव्यें असतात त्यांची, सोयीसाठी मध्यवर्ती, प्रांतिक व स्थानिक अशी विभागणी करण्यांत आली आहे. ह्या वाटणींत कांहीं बाबी मध्यवर्ती व्यवस्थेसाठी राखीव म्हणून ठेवण्यांत येतात आणि कांहीं स्थानिक स्वराज्यसंस्थांवर सोपवण्यांत येतात. कांहीं कामांत एक प्रकारची हिस्सेदारी असते. ह्या सर्व राज्यकर्त्या घटांनीं पहावयाचा कारभार त्यांच्या त्यांच्या परीनें लौकिक दृष्टीनें सारखाच महत्त्वाचा असतो. लोकांच्या जीविताचें आणि मालमत्तेचें रक्षण करण्याचें मध्यवर्ती राज्यकारभाराचें जसें जिव्हाळ्याचें कार्य आहे, तसेंच, लोकांच्या आरोग्याची काळजी घेणें हें स्थानिक स्वराज्य संस्थांचें काम अधिक नाहीं तरी तितक्याच महत्त्वाचें आहे; परंतु स्थानिक स्वराज्य संस्था राजकीय घटनेस अनुसरून मध्यवर्ती राज्यव्यवस्था मंडळानें घालून दिलेल्या मर्यादित कक्षेमध्यें वावरावयाच्या असल्यानें त्यांच्या कारभारासाठी करण्यांत येणारी पैशाची तजवीज अपुरी रहाते. स्थानिक कामें महत्त्वाचीं व विविध, पण तीं पार पाडण्यास लागणाऱ्या उत्पन्नाच्या बाबी मात्र मर्यादित, अशी परिस्थिति निर्माण होते, आणि नगरपालिका, लोकलबोर्डस व खेड्यांतील पंचायती ह्यांची उत्पन्न-खर्चाच्या संबंधांत कुचंबणा होते. ह्याविषयींच्या तक्रारी नेहमीं चालतात आणि त्या मिटवण्याचे मार्ग स्थानिक संस्थांस अधिक उत्पन्नाच्या बाबी तोडून देणें आणि ग्रँटसच्या मार्गानें त्यांस सढळ हातानें द्रव्यसहाय्य करणें हे होत. ज्या कामाची जबाबदारी मध्यवर्ती सरकारावर पडली असती ती स्थानिक स्वराज्य संस्थांनीं उचलली असल्याकारणानें त्यांस स्वतःच्या उत्पन्नापैकी योग्य हिस्सा देणें त्या सरकाराचें सरळ कर्तव्य ठरतें. हा लोकांच्या पैशाच्या योग्य वाटणीचा प्रश्न आहे. (अपूर्ण)

### फिलिपाइन्सला स्वतंत्र करण्यासाठी अमेरिकेची चढाई

आतां जपानच्या ताब्यांत असलेल्या फिलिपाइन्सवर अमेरिकेनें आघात करण्यास ता. २० ऑक्टोबर रोजीं प्रारंभ केला आहे, ह्या दृष्टीनें खालील माहिती उद्बोधक होईल. ह्या बेटांचें क्षेत्रफळ १,२१,००० चौरस मैल, म्हणजे ग्रेट ब्रिटन व आयर्लंड ह्यांच्या क्षेत्रफळाएवढें आहे. फिलिपाइन्समध्यें ७,००० बेटांचा समावेश होतो, परंतु त्यांपैकीं फक्त २,७७३ बेटांना स्वतंत्र नांवें आहेत. एक चौरस मैलापेक्षा ज्यांचें क्षेत्रफळ भरतें, अशीं बेटें फक्त ४६२ च आहेत.

फिलिपाइन्स बेटें अत्यंत डोंगराळ आहेत व कांहीं मोठ्या प्रमुख बेटांतील पर्वत पुष्कळच उंच आहेत. शेतीच्या उत्पादनांत मुख्यतः तांदूळ, नारळ, साखर, ह्यांचाच भरणा आहे. साखर उत्पादन करणाऱ्या देशांत फिलिपाइन्सचा अनुक्रम पांचवा आहे. १९३९ च्या शिरगणतीप्रमाणें, तेथील लोकसंख्या १ कोटि, ६० लक्ष असून त्यांपैकीं १ कोटि, ५८½ लक्ष फिलिपिनो आहेत. विदेशीयांत मुख्यतः चिन्यांचा (१,१७,४८७) भरणा आहे. १९३९ सालीं तेथें २९,०५७ जपानी व ८,७०९ अमेरिकन होते. फिलिपिनोंपैकीं १ कोटि, २६ लक्ष लोक ख्रिस्ती (रोमन कॅथॉलिक) आहेत. एकूण लोकसंख्येपैकीं ४% मुसलमान आहेत. स्पेन व अमेरिका ह्यांचेमधील युद्धानंतर १८९८ मध्यें फिलिपाइन्सचें प्रभुत्व अमेरिकेकडे गेलें. १९३५ सालीं फिलिपाइन्सचें कॉमनवेल्थ सरकार प्रस्थापित करण्यांत आलें व १९४६ सालीं तो देश पूर्णपणें स्वतंत्र व्हावा, अशी कायद्यांत व्यवस्था केलेली होती. परंतु मध्यंतरीं ७ डिसेंबर १९४१ रोजीं जपाननें त्या बेटांवर स्वारी करून आपली सत्ता तेथें प्रस्थापित केली. फिलिपाइन्समधून जपान्यांची हकालपट्टी झाल्यावर तेथील स्वतंत्र सरकारास मान्यता देण्याचें व त्याच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याचें अमेरिकेचें आजचें धोरण आहे.

# स्फुट विचार

## हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण

युद्धोत्तर काळांत हिंदुस्थानचें औद्योगीकरण मोठ्या प्रमाणावर व योजनात्मक रीतीनें घडवून आणण्याची आवश्यकता सरकार आणि जनता ह्या दोघांस सारखीच मान्य आहे. ह्यामुळें हिंदी उद्योगधंद्यांचे पुढारी आणि हिंदुस्थान सरकार ह्यांनीं औद्योगिक उन्नतीच्या योजना आखल्या आहेत. त्या सरकारचे औद्योगिक व योजनाकारक खात्याचे मंत्री, सर आर्देशीर दलाल, ह्यांनीं प्रस्तुत विषयाचे संबंधांत आपल्या काय कल्पना आहेत आणि त्यांस मूर्तस्वरूप देण्यासाठी कोणत्या प्रकारची तयारी चालू आहे ह्याचें दिग्दर्शन गेल्या आठवड्यांत मुंबईमध्यें भरलेल्या औद्योगिक सल्लागार समितीच्या सभेंत केलें. त्यांनीं सांगितलेल्या माहितीवरून हिंदुस्थान सरकारचा विचार भरीव कार्य करण्याचा असून हिंदी उद्योगधंद्यांस शक्य तितकें विस्तृत उत्तेजन देण्याचा आहे असें दिसून येतें. युद्धोत्तर काळांत हा विचार किती प्रमाणांत कृतीमध्यें वठतो ह्यावर अर्थात्च हिंदुस्थानचें औद्योगिक व आर्थिक भवितव्य अवलंबून आहे. तथापि, आखण्यांत येणाऱ्या योजना आणि त्यांस मूर्तस्वरूप देण्याचे योजलेले मार्ग ह्यांस विशिष्ट महत्त्व आहे ह्यांत संशय नाहीं. युद्धोत्तर काळांत नवीन धंद्यांची स्थापना व जुन्यांची वाढ व्हावयाची असतां जकातीचें व इतर संरक्षण मिळेल किंवा नाहीं ह्याविषयींची शंका येणें स्वाभाविक आहे. ह्या प्रश्नास सर आर्देशीर दलाल ह्यांनीं दिलेलें उत्तर समाधानकारक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. सध्याचें औद्योगिक संरक्षणाबाबतचें हिंदुस्थान सरकारचें धोरण अधिक व्यापक व प्रभावी करण्याचा सरकारचा मानस असल्याचें त्यांनीं जाहीर केलें आहे. टारिफ कमिशनच्या शिफारसींस अनुसरून नवीन हिंदी धंद्यांत जकातीचें वगैरे संरक्षण दिलें जाण्यापूर्वी कांहीं अटी त्यांनीं पुऱ्या केल्या पाहिजेत, असें शिफारस करणाऱ्या टारिफ बोर्डावर बंधन घालण्यांत आलेलें आहे. ह्या अटी जाचक असल्याची तक्रार आज कित्येक वर्षे केली जात आहे. त्या शिथिल करण्याचें आणि धंदेवाल्यांच्या संरक्षणविषयक मागण्यांची चौकशी करण्यासाठी टारिफ बोर्डाची कायमची स्थापना करण्याचें सरकारनें ठरवलें आहे असें सर आर्देशीर ह्यांनीं सांगितलें. नुसत्या संरक्षणाचाच नव्हे तर औद्योगिक प्रगतीच्या संबंधांतील भांडवलविषयक व इतर महत्त्वाच्या प्रश्नांचे बाबतींतल्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं उच्च दर्जाचें असें एक बोर्ड स्थापण्याच्या कल्पनेचाहि परामर्श घेण्यासारखा आहे असें ते म्हणाले. हिंदुस्थानचें पूर्ण औद्योगीकरण होण्यास ब्रिटिश सरकारचा पाठिंबा आहे हें स्टेट सेक्रेटरी, मि. एमरी, ह्यांच्या एतद्विषयक उद्गारांचा उल्लेख करून त्यांनीं निदर्शनास आणिलें आणि ह्या ध्येयास अनुसरून हिंदुस्थान सरकार झपाट्यानें पुढें जाईल असें आश्वासन दिलें.

---

## आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषदेंत हिंदी प्रतिनिधी

अमेरिकेंत आंतरराष्ट्रीय औद्योगिक परिषद् बोलावण्यांत आली असून तिच्या चर्चेत भाग घेण्यासाठीं हिंदुस्थानचे प्रतिनिधी गेले आहेत. हिंदी धंदेवाल्यांच्या वतीनें ह्या देशाची बाजू तेथें योग्य रीतीनें मांडण्याकरितां जें मंडळ नियुक्त करण्यांत आलें आहे त्याचें नेतृत्व मुंबईचे नामांकलेले व्यापारी सर चुनीलाल भाईचंद मेथा ह्यांस देण्यांत आलें आहे. सर चुनीलाल ह्यांस निरोप देण्याचा एक समारंभ मुंबईमध्यें गेल्या आठवड्यांत झाला. त्याप्रसंगीं इंडियन मर्चंट्स चेंबरचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, ह्यांनीं हिंदी धंदेवाल्यांचे दृष्टीनें अमेरिकेंत भरणाऱ्या परिषदेंत ह्या देशाच्या औद्योगिक गरजा व आकांक्षा कशा स्पष्टपणानें मांडल्या जाव्या ह्याविषयीं विवेचन केलें आणि सर चुनीलाल ह्यांनींहि आपल्या भाषणांत ह्याच विषयाची उद्बोधक चर्चा केली. जागतिक शांततेच्या रक्षणाचे प्रयत्न आजवर राजकीय व धार्मिक पुढाऱ्यांनीं केले आहेत, ते निष्फळ ठरल्यानें जगांतील व्यापारी वर्गानें तो प्रश्न आतां हातीं घेतला पाहिजे, पण तसें करतांना केवळ आर्थिक तत्त्वांचा उच्चार न करतां निरनिराळ्या देशांच्या अडचणी लक्षांत घेऊन त्या दूर होण्याच्या दृष्टीनें आंतरराष्ट्रीय देवघेवीची घडी त्यांनीं बसवली पाहिजे असें त्यांनीं सांगितलें. अनियंत्रित व्यापारानें हा आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवतां येईल असें मत अलीकडे युरोपांत व्यक्त केलें जात आहे, पण हीच तर हिंदी स्वदेशी धंद्यांची मुख्य अडचण आहे आणि त्यांचें योग्य रक्षण झाल्यावांचून जागतिक आर्थिक प्रश्न सुटावयाचा नाहीं असें सर चुनीलाल ह्यांनीं बजावलें. हिंदुस्थानांत राष्ट्रीय सरकार स्थापन होण्याचें अगत्य ह्या औद्योगिक संरक्षणाकरितां तीव्रतेनें भासत असल्याचेंहि त्यांनीं सांगितलें. जेव्हां जेव्हां जागतिक स्वरूपाच्या व महत्त्वाच्या परिषदा भरतात तेव्हां तेव्हां राष्ट्रीय वृत्तीच्या प्रतिनिधींनीं त्यांमध्यें उपस्थित होऊन आपली बाजू निर्भीडपणानें पुढें मांडणें अत्यावश्यक आहे असें त्यांनीं सुचवलें. अमेरिकेंत भरणाऱ्या औद्योगिक परिषदेंत चर्चेसाठी प्रश्न येतील त्यांचे संबंधांत हिंदी व्यापार व धंदे ह्यांच्या रक्षणाविषयीं खबरदारी घेतली जाण्याची जरूरी प्रतिपादावी लागेल असें सांगून हिंदी कापसाच्या निर्गतीचे बाबतींत अमेरिकेच्या ह्या धंद्याच्या संबंधांतील धोरणामुळें कशा अडचणी येण्याची भीति आहे हें त्यांनीं दाखवलें. परिषदेंत परवानगी मिळाल्यास हा प्रश्न उपस्थित करून हिंदी कपाशीच्या व्यापाराचें रक्षण होईल अशी तरतूद होण्याविषयीं आपण सूचना करणार असल्याचें सर चुनीलाल ह्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानच्या औद्योगिक उन्नतीची योजना यशस्वी होण्यास ह्या देशाच्या निर्गत व्यापारांत मोठी फूस राहिली पाहिजे आणि ती राहण्यास कपाशीची निर्गत मोठ्या प्रमाणांत झाली पाहिजे आणि ह्याकरितां अमेरिकन कपाशीच्या जागतिक स्पर्धेत हिंदी कपाशीस व्यापारांत योग्य वाटा मिळणें आवश्यक आहे अशी विचारसरणी त्यांनीं अंगिकारली.

---

## हिंदी विमा कायद्यांत सुधारणा—नव्या बिलाचा मसुदा

हिंदी विमा कायद्यांत १९४१ मध्यें विस्तृत सुधारणा करण्यांत आली. त्यानंतरच्या अनुभवांस अनुसरून आतां त्या कायद्यांत आणखी दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे आणि त्याकरितां हिंदुस्थान सरकारनें एक ४१ कलमांचें बिल तयार केलें आहे. विमा कंपन्या क्लेम्सचे पैसे देण्याचे बाबत निष्कारण विलंब लावतात व हयगय करतात, अशा कित्येक तक्रारी आल्याकारणानें त्या नाहींशा व्हाव्यात ह्याकरितां कडक उपाययोजना करण्यांत यावयाची आहे. क्लेम्सचे पैसे वेळेवर न देणाऱ्या कंपनींचा परवाना काढून घेतला जाईल. योग्य क्लेम्सचे पैसे वकशीर दिले गेले नाहेत अशी सुपरिंटेंडेन्ट ऑफ इन्शुअरन्सची खात्री झाल्यास, रजिस्ट्रे

हान पुनः चालू राहील. वरील कडक नियमास विमा कंपन्यांनी विरोध दर्शविलेला आहे, परंतु त्यांतील मूळ तत्त्वाबाबत मतभेद होण्याचें प्रयोजन नाहीं. विमा कायद्याप्रमाणें कंपन्यांना डिपॉझिट रकमा ठेवाव्या लागतात व सोयीसाठी ब्रिटिश हद्दींतील कंपन्यांनी ठेवलेली डिपॉझिटस संस्थानी सरकार मान्य करतात व संस्थानी हद्दींतील कंपन्यांनीं ठेवलेलीं डिपॉझिट्स ब्रिटिश हिंदी सरकार मान्य करतें. साहजिकच हीं डिपॉझिट्स परत करतेवेळीं दोन्ही ठिकाणच्या विमाअधिकाऱ्यांची संमति घेतली जाणें इष्ट आहे व त्या दृष्टीनें कायद्यांत दुरुस्ती होणार आहे. विमा कंपनीच्या एकूण निधीपैकीं विमा फंडाची रकम स्वतंत्रपणें गुंतविली जावी व आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कंपनीचा लाइफ फंड त्याचा उद्देश पार पाडण्यास पुरेसा आहे अशी सुपरिंटेंडेंट ऑफ इन्शुअरन्सची खात्री झाली तरच त्या कंपनीला इतर प्रकारच्या विम्याचें काम करण्यास परवानगी मिळावी अशीहि दुरुस्ती कायद्यांत केली जाणार आहे. आयुर्विमा कंपन्यांचा भक्कमपणा वाढविणें हा नियोजित बिलाचा उद्देश आहे.

---

### कै. गुरुनाथराव ओगले–शोकप्रदर्शन व स्मारक

ओगले ग्लास वर्क्सचे एक चालक व "प्रभाकर" कंदिलाचे जनक, श्री. गुरुनाथराव ओगले ह्यांच्या अकालीं निधनाबद्दल शोक प्रदर्शित करण्यासाठी नागरिकांची जाहीर सभा २५ ऑक्टोबरे रोजीं केसरी मराठा संस्थेच्या दिवाणखान्यांत श्री. दा. वा. पोतदार ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणानंतर श्री. आ. रा. भट ह्यांनीं मृताच्या स्मृतीला गौरवपर पुष्पांजलि अर्पिणारे संदेश वाचून दाखविले व दुःखप्रदर्शनाचा आणि स्मारकाचा मुख्य ठराव मांडला. त्याला श्री. दा. वि. गोखले, श्री. न. वि. गाडगीळ व श्री. न. गं. आपटे ह्यांनीं समयोचित भाषणें करून पाठिंबा दिला. मराठा चेंबरनें पुढाकार घेऊन कै. गुरुनाथराव ओगले ह्यांचें समयोचित स्मारक करावें, अशा आशयाचा तो ठराव आहे. कै. गुरुनाथरावांचे चुलत बंधु श्री. य. धों. ओगले ह्यांनीं त्यांच्या आठवणी सांगितल्यावर सभेनें दोन मिनिटें स्तब्ध उभें राहून ठराव संमत केला. श्री. चिं. वि. चितळे ह्यांनीं अध्यक्षांचे आभार मानले. स्मारकाच्या ठरावास अनुसरून चेंबरच्या कार्यकारी मंडळानें योजना आखुन कार्यास प्रारंभ केला आहे, असें समजतें.

---

### पुणें सहकारी सप्ताह

सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, पुणें, ह्या संस्थेच्या विद्यमानें रविवार, ता. २९ ऑक्टोबर रोजीं सायंकाळीं सहकारी सप्ताहाचा प्रारंभ करण्यांत आला. प्रो. काळे अध्यक्ष आणि मुख्य वक्ते होते. श्री. चितळे, श्री. करंदीकर व श्री. येरवडेकर ह्यांचीहि भाषणें झालीं. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत सहकाराचें ध्येय, तत्त्वें व व्यवहार ह्यांचें विवेचन करून ह्या संघटनेचें संवर्धन कोणत्या पद्धतीनें व मार्गानें होणें अगत्याचें आहे ह्यावर विचार प्रदर्शित केले आणि सेंट्रल बँकेशीं व पुण्यांतील इतर सहकारी संस्थांशीं संलग्न असलेल्या कार्यकर्त्यांचें त्यांचा उत्साह व कार्यतत्परता ह्याबद्दल अभिनंदन केलें. रावसाहेब खोले; बँकेचे चेअरमन, ह्यांनीं अध्यक्षांचें समयोचित शब्दांनीं आभार मानल्यावर उद्घाटनाचा समारंभ समाप्त झाला.

### बँक ऑफ महाराष्ट्र लि. शेड्यूल्ड बँक झाली

बँक ऑफ महाराष्ट्र लि.चें नांव रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या शेड्यूलमध्यें दाखल करण्यांत आलें असल्याचें वृत्त प्रसिद्ध झालें आहे. कित्येकांनीं, महाराष्ट्र बँक पहिल्या शेड्यूलमध्यें न आल्याकारणानें इतर कांहीं शेड्यूल्ड बँकांपेक्षा तिचा दर्जा कमी आहे काय ? अशी शंका गैरमाहितीमुळें व्यक्त केली आहे. वास्तविक सर्वच शेड्यूल्ड बँकांची यादी दुसऱ्या परिशिष्टांत दिलेली असते. रिझर्व्ह बँक कायद्याला एकूण पांच परिशिष्टें आहेत. पहिल्या परिशिष्टांत, बँकेच्या पांच शेअर रजिस्टरांचें क्षेत्र स्पष्ट करून सांगितलेलें आहे; दुसऱ्या परिशिष्टांत शेड्यूल्ड बँकांची यादी आहे; तिसऱ्यांत रिझर्व्ह बँक व इंपीरिअल बँक ह्यांचेमधील कराराचा तपशील आहे; चवथ्यांत भागीदारांना द्यावयाच्या डिव्हिडंडसंबंधीं नियम आहेत व पांचव्यांत बँकेनें दर आठवड्यास प्रसिद्ध करावयाच्या हिशेबाचा तक्ता दिलेला आहे. सर्व एक्सचेंज बँका, इंपीरिअल बँक, वगैरे शेड्यूल्ड बँकांचीं नांवें दुसऱ्या परिशिष्टांत आहेत व त्यांतच नव्या शेड्यूल्ड बँकांचीं नांवें दाखल झालीं म्हणजे सरकारी गॅझेटांत त्याप्रमाणें घोषणा होते.

---

### आयुर्वेद रसशाळा पुणें लि.

वरील कंपनीस ३१ मे, १९४४ अखेर संपलेल्या वर्षी २४,०४५ रु. निव्वळ नफा झाला. साधारण भागीदारांना ४½% (इनकमटॅक्स ह्यांतून कापून द्यावयाचा) डिव्हिडंड मिळणार आहे. कंपनीनें अहवालाचे वर्षी २,७२,३१७ रुपयांची विक्री केली. कच्चीं, पक्कीं व तयार होत असलेलीं औषधें ह्यांच्या शिल्लक मालाची किंमत ३,८१,९३२ रुपये आहे.

### मोफत वाचनालय रौप्य उत्सव

पुण्यांतील श्रीगणेश मोफत वाचनालय व ग्रंथालय संस्थेस विजयादशमीस २५ वर्षें पूर्ण झाल्यानें येत्या वर्षअखेर संस्थेचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. संस्थेच्या इमारत-निधीचे पूर्वतयारीसाठी संस्थेचे चिटणीस श्री. हरि भालचंद्र देशपांडे हे मदत गोळा करण्यासाठी फिरणार आहेत. तरी इच्छेनुसार इमारत-निधीसाठी चिटणीस, श्रीगणेश मोफत वाचनालय, ८ कसबा पेठ पुणें, या पत्त्यावर मदत पाठवावी असें सदर संस्थेचे चिटणीस कळवितात.

### कपास खरेदी-विक्रींत २५ लक्ष पौंडांचा तोटा

मार्च, १९४४ अखेर संपणाऱ्या तीन वर्षांत ब्रिटिश सरकारनें सूत व कापड ह्यांच्या किंमती स्थिर राखण्यासाठी कपास घाऊक खरेदी करून विकली, त्यांत सरकारला २५ लक्ष पौंड तोटा आला.

### हिंदी स्त्रीच्या ताब्यांत लष्करी भाजीचा मळा

सदर्न आर्मी हेडक्वार्टर्सच्या भाजीपाल्याच्या मळ्याची व्यवस्था जत संस्थानच्या रहिवासी सार्जंट राजुल शहा (वुमेन्स ऑ. कोअर) ह्या स्त्री जैन बी. एजी. पदवीधराकडे सोपविण्यांत आलेली आहे.

### गीता प्रचारासाठी ९ लक्ष रुपयांची देणगी

संयुक्त प्रांतांतील एका धनिकानें आपली सर्व संपत्ती (सुमारें ९ लक्ष रुपये) मथुरा येथें गीतामंदिर बांधण्यासाठी व गीतेच्या शिकवणीसाठी-पुस्तकें व मासिक प्रसिद्ध करण्यासाठी देऊन टाकली आहे.

## पत्नीच्या नांवानें उत्पन्न लिहून ठेवलें

### पतीस प्राप्तीवरील कर द्यावा लागणार नाहीं

६ मे, १९३७ रोजीं श्री. डी. आर. शहापुरे ह्यांनीं आपल्या हिशेबाच्या वहींत आपण पांचवी बायको करीत असून कुटुंबीयांच्यासाठीं पैशाची व्यवस्था करीत असल्याचें नमूद केलें. ह्या व्यवस्थेप्रमाणें, ह्या पांचव्या पत्नीस तिच्या हयातींत, २०,००० रुपयांच्या भांडवलावरील उत्पन्नाचे दरसाल ६०० रुपये मिळावयाचे होते. हे २०,००० रुपये श्री. शहापुरे ह्यांनीं आपल्या धंद्यांतच गुंतविलेले होते. ह्या भांडवलावर पत्नीचा कांहींहि अधिकार नव्हता. हें भांडवल पत्नीच्या नांवें वर्ग करण्यांत आलेलें नाहीं, ह्या मुद्यावर इनकमटॅक्स अधिकाऱ्यांनीं भांडवलावरील उत्पन्न हें श्री. शहापुरे ह्यांचेंच उत्पन्न आहे असें ठरविलें व त्यावर कर बसविला. मुंबई हायकोर्टांत हें प्रकरण गेलें, तेव्हां हायकोर्टानें श्री. शहापुरे ह्यांच्या वहींतील नोंदीचा अर्थ "पत्नीस तिच्या हयातींत उत्पन्न तोडून दिलें आहे" असाच केला. पतीनें आपल्या पत्नीचें पोषण केलेंच पाहिजे असा कायदा असला तरी प्रस्तुत व्यवस्थेशीं त्या जबाबदारीचा संबंध नाहीं; ६०० रुपयांच्या उत्पन्नाचा विनियोग पाहिजे त्याप्रमाणें करण्यास पत्नीस मोकळीक होती, पत्नीच्या हयातींत पतीस ह्या उत्पन्नाचा कांहींहि प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा मिळावयाचा नव्हता; इत्यादि मुद्दे मांडून हायकोर्टानें इनकमटॅक्स कायद्याच्या १६ (१) (क) ह्या कलमांत श्री. शहापुरे ह्यांचें प्रकरण बसत नाहीं असें ठरविलें व त्यांचेवर ६०० रुपयांच्या उत्पन्नावर कर बसवितां येत नाहीं, असा निवाडा केला.

### दि मराठा मार्केट पीपल्स को. बँक लि., मुंबई

बँकेचें वसूल भांडवल २७,६२० रुपये असून तिचेकडे ४ लक्ष, ६८ हजारांच्या ठेवी आहेत. जिंदगीपैकी ७७ हजार रु. रोख, ३ लक्ष ७४ हजार रु. रोख्यांत व ५२½ हजार रुपये कर्जांत गुंतलेले आहेत. बँकेस 'अ' वर्ग मिळाला आहे, खेळतें भांडवल व व्यवहार वाढला आहे. नफा ६,८५६ रुपये झाला.

### इंदूर परस्पर सहकारी पेढी, मर्यादित, इंदूर

अहवालाचे वर्ष असेर पेढीचे पटावर १,४७९ सभासद होते. ठेवींचा आकडा ८¾ लक्ष रुपये झाला आहे. भाग भांडवल ९८,८०० व गंगाजळी आणि इतर रिझर्व्ह ह्यांत १ लक्ष, २½ हजार रुपये आहेत. गेल्या वर्षीच्या मानानें ह्या वर्षी कर्जाची रकम ५५½ हजार रुपयांनीं घटली आहे व ती २ लक्ष, २१' हजार रुपये आहे. थकलेल्या बाकीची रकम ८०½ हजार रुपये आहे. अहवालाचे वर्षी पेढीस १२,४२० रुपये नफा झाला. ५% प्रमाणें डिव्हिडंड देण्यांत आलें.

### सातारा जिल्हा को. लँड मार्गेज बँक लि., कराड

मागील वर्षांत २१ सभासदांनीं त्यांजकडे असलेलें कर्ज (२१,१२५ रु.) मुदतीपूर्वी फेडलें, तर अहवालाचे सालीं आणखी १० सभासदांनीं असेंच १३,५५० रुपये कर्ज फेडलें. नवीन कर्जमागणी येत नाहीं, परंतु बँकेच्या विशेष प्रचारामुळें अहवालाचे वर्षी ७४ अर्ज दाखल झाले. ५१ सभासदांना ३९,५५० रुपये कर्ज वाटण्यांत आलें. बँकेस वर्ष असेर ४,३७६ रुपये नफा झाला. ५% डिव्हिडंड वाटण्यांत आलें. बँकेचें सभासदांकडून येणें कर्ज ३ लक्ष, ३९ हजार रुपये आहे.


**न्यू इंडिया इंडस्ट्रीज लि.**

(Approved Re-treaders and Approved Contractors)

२६ लॅमिंग्टन नॉर्थ, मुंबई ११.

अध्यक्षः—श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी.

**महाराष्ट्रांतील रबराचा प्रमुख कारखाना**

★ गिरणीचे रोलर्स ★ रबरी हातमोजे ★ छापखान्यांचे रोलर्स

★ रीमोल्ड टायर्स ★ रबरी वॉशर्स ★ सॉलिड व्हील्स

व इतर रबरी माल तयार होतो.

पु. म. मराठे

मॅनेजिंग डायरेक्टर.

गिरगांव मुंबई नं. ४

**महिंद्रकर ब्रदर्स**

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## औद्योगिक शेअर्सच्या किमतींत वाढ

युद्धजन्य परिस्थितीमुळें औद्योगिक कंपन्यांचे नफे वाढले व शत्रूच्या हल्ल्याचें भय कमी झालें, त्या प्रमाणांत ह्या हिंदी कंपन्यांच्या भागांची किंमतहि वाढत गेली. पैसे गुंतविण्यास इतरत्र जागा नसल्या कारणानें व मे, १९४३ मध्यें नव्या कंपन्यांच्या स्थापनेवर बंधनें घातल्याकारणानें, शेअर बाजाराकडे पैशाचा ओघ चालु राहिला आणि औद्योगिक कंपन्यांचे भागास तेजी आली. ऑगस्ट १९३९ मध्यें कंपन्यांच्या भागांची किंमत १०० मानली, तर १९४१–४२, १९४२–४३ व १९४३–४४ मध्यें त्यांची शतमानानें तुलनात्मक किंमत किती वाढली, हे दर्शविणारे आकडे खालीं दिले आहेत:—

| | ऑगस्ट १९३९ | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ |
|---|---|---|---|---|
| बँका | १०० | ११०·८ | ११७·५ | १५५·५ |
| कपास गिरण्या | १०० | १७७·२ | २१३·५ | २६९·५ |
| कोळसा | १०० | १२५·३ | १३३·८ | १९०·४ |
| ताग गिरण्या | १०० | १२९·८ | १३१·९ | १७०·० |
| खाणी | १०० | १०४·६ | १०६·८ | १५५·२ |
| सिमेंट | १०० | १२५·७ | १५८·१ | २०८·० |
| इंजिनिअरिंग | १०० | १४४·५ | १४९·७ | १९६·६ |
| चहा | १०० | १३६·३ | १५९·१ | २२६·४ |
| साखर | १०० | १५३·३ | १८९·३ | २६५·४ |
| इतर | १०० | १५६·१ | १६७·८ | १९९·६ |
| सरासरी | १०० | १४५·२ | १५९·३ | २९०·१ |

१९२७-२८ मधील प्रातिनिधिक शेअर्सची व रोख्यांची किंमत १०० मानली, तर गेल्या तीन वर्षांत शतमानानें त्या किंमतींत किती वाढ घट झाली, हें खालील आकडे सांगतील:—

| | १९४१–४२ | १९४२–४३ | १९४३–४४ |
|---|---|---|---|
| सरकारी रोखे | ११५·९ | ११५·० | ११७·२ |
| ठराविक व्याजाचे शेअर्स | १५५·९ | १४४·९ | १६४.३ |
| कपास ( २२ शेअर्स ) | १११·० | १४६·६ | १९८·८ |
| ताग ( २० शेअर्स ) | ५७·२ | ५३·९ | ६५·६ |
| कपास ( १३ शेअर्स ) | १५२·५ | १६१·३ | २२७·२ |
| लोखंड-पोलाद ( ३ शेअर्स ) | ५०४·३ | ४४१·५ | ५५५·९ |
| चहा ( १९ शेअर्स ) | ७७·७ | ८६·९ | ११८·० |
| साखर ( ३ शेअर्स ) | १०७·२ | १४१·७ | २११·४ |
| सिमेंट ( १ शेअर ) | १९३·९ | २३५·९ | २७८·४ |
| कागद ( २ शेअर्स ) | ३२३·९ | ३५९·९ | ४६८·० |
| सरासरी | १२९·९ | १३८·६ | १८२·२ |

### संगमनेर व्यापारी असोसिएशन

वरील संस्थेस संगमनेरचे मूळ रहिवासी, न्यू सिटिझन बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. डी. देशपांडे ह्यांनीं व श्री. कुं. सो. फिरोदिया, एम. एल. ए. ह्यांनीं नुकतीच भेट दिली. श्री. देशपांडे ह्यांनीं बँक व तिचेपासून फायदे ह्याची विस्तृत माहिती सांगितली. श्री. फिरोदिया ह्यांनीं, व्यापाऱ्यांनीं त्यांची शेती असल्यास ती सुधारावी व इतर जोडधंदे सुरू करून उत्पन्न वाढवावें, असा उपदेश केला.


* *

पूना गेस्ट हाउस



. टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :

* * कै. नानासाहेब सरपोतदार

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींचें कथानक ! किं. १ रु. लिहा. विराट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस

बुधवार चौक, पुणें २.

डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध

लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा

दोन वेळा उपयोग

दि मागोरा केमिकल कं. लि.

— हिराबाग, पुणें २ —


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.